**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६५१४/२०२४**
**नि.क्र.** ११
(सरकार वि. कुमार फलके)

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माझे नाव | - | राजेंद्र भागुजी पालवे | | |
| वय | - | ५७ वर्षे, | व्यवसाय | - शेती |
| राहणार | - | मेहेकरी, ता.नगर, जि. अहमदनगर | | |

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे विधीज्ञ श्री.एस.पी. तडके यांच्याकडून</u>**

१. दिनांक १९.०५.२०२४ रोजी निमगाव वाघा येथे घटना घडली. मला हवालदार खंडेराव शिंदे यांनी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. त्याठिकाणाहुन आम्ही खाजगी वाहनाने निमगाव वाघा येथे गेलो.

२. त्याठिकाणी एक इसम भिंतीच्या आडोशाला अवैध हातभट्टी दारु विक्री करत होता. आमची चाहुल लागताच तो पळुन गेला. त्याठिकाणी आम्ही गावठी हातभट्टी दारू २०० लिटर आणि १५ लिटर दोन प्लास्टीकचे ड्रमधुन जप्त केली. त्याची अंदाजे किंमत रूपये १५,०००/-. त्यातुन १८० मि.ली.ची एक बॉटल सिल करुन त्याप्रमाणे पंचनामा केला. उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केले. आता मला दिनांक १९.०५.२०२४ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.१२** देण्यात आली. पंचनामा किती वाजता केला हे मला आठवत नाही. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकत नाही.
सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.पी.गोरे यांच्याकडून सुरू</u>**

३. मला पंचनामा करण्याकरिता लेखी नोटीस दिले नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी नगर तालुका पोलीस ठाण्याच्या बऱ्याच केसेसमध्ये पंच म्हणुन काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जो मुद्देमाल मिळाला तो बेवारस मिळाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी किंवा इतर कोणी त्याठिकाणी मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे

खरे नाही की, मी पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

**साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
( माधुरी रा.खनवे)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं. ७, अहमदनगर.

दिनांक :- ०२/०९/२०२५